# नियमित दिवाणी दावा क्र. १७०/२०१८ मधील नि. १ व ७२ वरील संयुक्त आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००३७५–२०१८)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांनी दाव्यात दुरुस्ती केली असून दाव्याचा आकार व मुल्य रु.५,८५,०००/– झाले आहे त्यामुळे आर्थिक अधिकार क्षेत्रानुसार प्रस्तुत दावा चालविण्याचा अधिकार दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांना असल्याने दाव्याने नव्याने क्रमांक देवून दावा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचेकडे वर्ग करण्यात यावा, असे वादीचे कथन आहे.

३. प्रतिवादींनी त्याच अर्जावर म्हणणे देवून कथन केले की, योग्य तो आदेश करण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत दावा दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर आस्थापना येथे दाखल झाल्यावर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीगोंदा यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. त्यावेळी दाव्याचा आकार व किंमत रु. ३१४१.६०/– होती. तथापि, नि. ६७ वरील आदेशानुसार वादीने दावा दुरुस्ती केली असून त्यानुसार दाव्याचा आकार रु. ५,८५,०००/– किंमतीने वाढला आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकारक्षेत्र दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांना नाही. सिव्हील मॅन्युअल कलम २३३ नुसार प्रस्तुत प्रकरण दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचेकडे वर्ग होण्यासाठी विनंतीपत्र मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांना पाठविणे आवश्यक होते. तथापि, दरम्यानचे काळात मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे आदेशानुसार दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्रीगोंदा या

न्यायालयाकडुन दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीगोंदा या न्यायालयास जे दावे वर्ग करण्यात आले त्यामध्ये प्रस्तुत दावा देखील वर्ग झाला आहे. त्यामुळे सिव्हील मॅन्युअल कलम २३३ नुसार पुर्तता करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तथापि, दाव्याचे आकार व मुल्य रुपये पाच लाख पेक्षा अधिक झाले असल्याने प्रस्तुत दावा विशेष दिवाणी दावा या वर्गवारीत नोंद करणे आवश्यक आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि. ७२ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अधिक्षक यांना निर्देश देण्यात येतो की, नियमित दिवाणी दावा नं. १७०/२०१८ हा दावा विशेष दिवाणी दावा या वर्गवारीत नोंद करण्यात यावा व दावा रजिष्टर तसेच सीआयएस प्रणालीमध्ये त्याबाबत आवश्यक ती नोंद करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे पुर्तता करुन प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेखा पुढील आदेशाकरीता दिनांक २४/०७/२०२३ रोजी या न्यायालयासमोर सादर करण्यात यावा.

GIRISH MADHUKAR SADHALE
Digitally signed by GIRISH MADHUKAR SADHALE
Date: 2023.07.17 22:38:53 +0530

श्रीगोंदा.
दिनांक १७/०७/२०२३.

**( जी. एम. साधले )**
सहदिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.